(1)

Date ______
Page ______

## कचरा

कचरा हा शब्द सुध्दा उच्चारला तर बरेच लोक नाक मुरडतात. कचऱ्याची व्याख्या काळानुसार बदलली आहे. एखादी वस्तू वापरण्या योग्य राहीली नाही तर आपण तीला कचरा म्हणतो. पण ही झाली कचऱ्याची जुनी व्याख्या. सध्याच्या काळात एखाद्या व्यक्तीला वस्तू चांगली चालत असली तरी वापरावी वाटेनाशी झाली कि त्या व्यक्तीच्या दृष्टीने कचराच होते. २१ व्या शतकात कचरा निर्माण व्हायचा वेग खुपच वाढला आहे. पुर्वीच्या काळी जुनी भांडी वापरायची पध्दत होती. मोठा भाऊ, बहीण यांचे कपडे लहान भाऊ बहीण वापरायचे. एकंदरीत समाजामध्ये सर्व वस्तू जपून वापरायची पध्दत होती. परंतु गेल्या ३०/३५ वर्षात समाजातील सर्व स्तरातील व्यक्तींची आर्थिक स्थिती सुधारली व माणसाच्या मानसिकतेत मोठा बदल घडून आला. बदलल्या जीवनशैलीमुळे नवीन नवीन वस्तू घेण्याचा पायंडाच पडला. याच जीवनशैलीमुळे इलेक्ट्रॉनीक व प्लॅस्टीक कचऱ्याचे प्रमाण वेगाने वाढत चालले आहे. अमेरिका, युरोप, जपान या सारख्या प्रगत प्रदेशांमध्ये कचरा निर्माण होण्याचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

कारखान्यामधून निर्माण होणारा कचरा, सांडपाणी, घनकचरा, प्लॅस्टीक, इलेक्ट्रॉनिक वेस्ट, वैद्यकिय कचरा असे कचऱ्याचे अनेक प्रकार असले तरी सामान्य माणसाचा जास्त जवळचा संबंध असतो घरामध्ये निर्माण होणाऱ्या कचऱ्याशी. आपले घर मुळामध्ये कचरा निर्माण करण्याचे केंद्रच आहे. घरामध्ये विशेषतः टाकाऊ अन्न पदार्थापासून निर्माण झालेल्या कचऱ्याचे ढीग झाल्यास त्यातून दुर्गंधी सुटते, खराब पाणी वहायला लागते, कॉलरा, जुलाब सारखे साथीचे रोग पसरतात. सांडपाण्याचे व्यवस्थापन शास्त्रीय पध्दतीने ~~~~ झाले नाहीतर हे पाणी जमिनीत झिरपून पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांमध्ये मिसळते. पुण्याजवळील फुरसुंगीमध्ये

(2)

Date
Page

असेच कचऱ्याचे प्रचंड ढीग होऊन तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पुणे महानगरपालिकेने ओला व सुका कचरा वेगळा करण्याचा नियम करून ओला कचरा जिरवून हा प्रश्न सोडवण्याचा पुष्कळ अंशी यशस्वी असा प्रयत्न केला आहे. अनेक नागरिक ओला कचऱ्याचे व्यवस्थापन घरातील बागेत करतात. या पद्धतीने घरातील बाग उत्कृष्टपणे फुलू शकते. तसेच कचरा प्रत्येकाने घरातच जिरवल्यास व्यवस्थेवरचा ताण कमी होतो. पुण्यासारख्या शहरात रोज २००० टन कचरा निर्माण होतो. यावरून कचऱ्याचे नियोजन हा प्रश्न किती ज्वलंत आहे याची कल्पना येते. काही सोसायट्यांमध्ये कचऱ्याचे नियोजन करण्याची व्यवस्था उभी केलेली असते. शहरातील कचऱ्याचे व्यवस्थापन नागरिकांच्या आरोग्याशी निगडीत असून या व्यवस्थापनेमध्ये नागरिकांच्या सक्रिय सहभागाची जरुरी असते.

नव्या चंगळवादी वृत्तीमुळे माणसाची कपडे विकत घेण्याची हौस खूपच वाढली. वारंवार कपडे विकत घेण्याच्या प्रवृत्तीमुळे जुन्या कपड्यांचा कचरा हा प्रश्न हळू हळू उग्र रूप धारण करू पाहत आहे. यातूनच जुने कपडे आदीवासी भागात तसेच इतर गरिब लोकांना वाटायला सुरुवात झाली. काही प्रमाणात जुन्या कपड्यांचा उपयोग गोधड्या तसेच नाहतांची सिट कव्हर्स शिवणे इत्यादी ठिकाणी होतो.

आज जगात सर्वात धोकादायक पद्धतीने वाढणारा कचरा म्हणजे प्लॅस्टीक. प्लॅस्टीकचा शोध लागून साधारणपणे १२५ वर्षे झाली. पण इतक्या कमी वेळात प्लॅस्टीकने जवळपास प्रत्येक वस्तूला पर्याय दिला आहे. प्लॅस्टीक विघटनशील नाही परंतु प्लॅस्टीकचे काही प्रकार रिसायकल करता येतात. प्लॅस्टीकचे लहान कण विघटीत व्हायला ५०० वर्षे लागू शकतात. समुद्राच्या तळाशी

प्लॅस्टीक कचऱ्याचे प्रदूषण प्रचंड वाढलय. समुद्रातले अनेक प्राणी प्लॅस्टीक हे अन्न समजून खातात. प्लॅस्टीक त्यांच्या पोटात अडकते व त्यात त्यांचा मृत्यू होतो. जवळपास सर्व समुद्र किनारे प्लॅस्टीक कचऱ्यामुळे प्रदुषित झाले आहेत. २०१६ मध्ये संपुर्ण जगात 25 कोटी टन कचरा निर्माण झाला. त्यात 12% प्लॅस्टीकचा वाटा होता.

सर्व प्रकारच्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे हा आजच्या मानवापुढील यक्ष प्रश्न आहे. फक्त कायदे करून हा प्रश्न सुटणारा नाही. प्रत्येक नागरिकाचा सहभाग यात असणे आवश्यक आहे. निसर्गचक्रामध्ये मानवाने ढवळा-ढवळ केली तर निसर्गाचा कोप टाळता येणार नाही. पर्यावरण, प्रदुषण आणि आधुनिक विकास यातील संतुलन बिघडणे मनुष्याकरीता धोकादायक ठरू शकते व त्याचे काही अनुभव आपण आजच्या काळात घेत आहोत. सर्व प्रकारच्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट, चंगळवादावर मर्यादा यासारख्या बाबी या सर्व प्रक्रियेमध्ये कळीच्या ठरतात. आजच्या भारतात या सर्व घटकांबाबत जागृती सुरु झालेली आहे ही समाधानाची बाब आहे. परंतु आव्हाने महाकाय आहेत आणि आपल्याला अजून लांबचा पल्ला गाठायचा आहे हे निश्चित.

ओंकार फुलंब्रीकर
कोथरूड
9225634065

